मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482




# महेश लांडगे यांची खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेत नियुक्ती!

## खनिजप्रभावित भागांच्या विकासासाठी लांडगे आक्रमक; मूलभूत सुविधांना मिळणार बळ!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या कामकाजाला अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आमदार महेश लांडगे यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवर (गव्हर्निंग कौन्सिल) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा नियामक परिषदेचे सदस्य सचिव आनंद पाटील यांनी याबाबतचे अधिकृत पत्र दिले आहे.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित सदस्य लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असेपर्यंत त्यांचा नियामक परिषदेवरील कार्यकाळ कायम राहणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर नियामक परिषदेवरील सदस्यत्व आपोआप संपुष्टात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणातून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांच्यावर नियामक परिषदेच्या सदस्यपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### खनिजप्रभावित भागांच्या विकासासाठी प्रभावी भूमिका!

जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीचा प्रभावी वापर करून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देण्याची मोठी जबाबदारी नियामक परिषदेवर असते. आमदार लांडगे यांच्या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील अशा भागांच्या विकासाशी संबंधित प्रश्नांना अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

"जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देणे, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि उपलब्ध निधीचा प्रभावी व पारदर्शक वापर सुनिश्चित करणे, ही आपली प्राथमिकता राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या विकासाच्या दृष्टिकोनाला पूरक काम करण्याचा माझा प्रयत्न असेल," असे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

> "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये मूलभूत सुविधा आणि विकासकामांना अधिक गती देण्यासाठी नियामक परिषदेवर मिळालेल्या जबाबदारीचा प्रभावीपणे उपयोग करू. खनिज निधीचा योग्य, पारदर्शक आणि लोकहितासाठी विनियोग होईल, यासाठी कटिबद्ध राहू."
>
> -महेश लांडगे, **आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# महापौर रवी लांडगेंसाठी ५ कोटींचा 'राजेशाही' बंगला; महापालिकेची तरतूद मंजूर!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. निगडी प्राधिकरणातील सेक्टर २७ येथे महापौरांसाठी अधिकृत निवासस्थान उभारण्याचे नियोजन करण्यात आले असून, या कामासाठी २०२६-२७च्या सुधारित अर्थसंकल्पात पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. महापौर रवी लांडगे यांनी महापौर निवासस्थानाच्या बांधकामाबाबत प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्राधिकरणातील आरक्षित जागेवर निवासस्थान उभारण्यात येणार आहे. या तरतुदीसाठी स्थानिक संस्था कर परताव्याच्या लेखाशीर्षातील पाच कोटी रुपयांच्या निधीत घट करण्यात आली आहे.**



दरम्यान, मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेत मृत्यू झालेल्या नऊ जणांच्या नातेवाइकांना महापालिकेकडून प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. एकूण ९० लाख रुपयांच्या मदतीस सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असून, त्यासाठी 'आपत्तीग्रस्त नागरिकांना आर्थिक साहाय्य' या लेखाशीर्षात आवश्यक तरतूद वाढविण्यात आली आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने बीआरटी आणि उच्च क्षमता द्रुतगती मार्गावर (एचसीएमटीआर) तीन डब्यांची विजेवर चालणारी 'ईआरटीएस' बस सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात भोसरीतील गोडाऊन चौक, कुदळवाडी चौक, ऑटो क्लस्टर, काळेवाडी फाटा, जगताप डेअरी आणि वाकड चौक असा सुमारे १७ किलोमीटरचा मार्ग निश्चित करण्यात आला असून, या मार्गासाठी आराखडा तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.यासोबतच शहरातील वाहनतळ व्यवस्थेला शिस्त लावण्यासाठी संपूर्ण शहरासाठी नव्याने सशुल्क वाहनतळ धोरण निश्चित करण्यात आले आहे. रस्त्यालगत तसेच रस्त्याबाहेरील पार्किंगचे नियोजन करण्यात आले असून, 'टेलिस्कोपिक' शुल्क रचना, पार्किंग पास आणि निवासी पार्किंगनुसार शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. या सशुल्क वाहनतळ धोरणालाही सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात ६० विद्यार्थी क्षमतेचे बीएससी नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. या महाविद्यालयासाठी उभारण्यात आलेल्या ११ मजली नवीन इमारतीला 'वायसीएम विद्यासदन' असे नामकरण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

### मोशी दुर्घटनेतील कुटुंबीयांना दिलासा!

मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेत मृत्यू झालेल्या नऊ जणांच्या नातेवाइकांना पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यासाठी एकूण ९० लाख रुपयांची तरतूद करण्यास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली असून, 'आपत्तीग्रस्त नागरिकांना आर्थिक साहाय्य' या लेखाशीर्षात आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

# गणेशोत्सवासाठी महापालिका ॲक्शन मोडमध्ये!

## विसर्जन व्यवस्था, स्वच्छता आणि निर्माल्य संकलनाचे काटेकोर नियोजन

» पिंपरी | प्रतिनिधी

**आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासह गणेशमूर्ती विसर्जनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. गणेशोत्सव काळात नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी घेतला.**



महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात ही बैठक झाली. यावेळी सहायक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, महेश आढाव, अंकुश झिटे, राजेश भाट, अतुल सोनवणे, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील स्वच्छता व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मार्गांची नियमित स्वच्छता राखावी. विसर्जनस्थळी आवश्यक मनुष्यबळ, साधनसामग्री आणि स्वच्छता सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेत गणेशोत्सवासाठीची सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी.

### विसर्जन मार्गांवरील स्वच्छतेवर विशेष भर!

गणेशोत्सव काळात गणेश मंडळांचे परिसर, सार्वजनिक ठिकाणे आणि विसर्जन मार्गांची नियमित स्वच्छता करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर कचरा साचणार नाही, यासाठी आवश्यक नियोजन करावे. विसर्जनानंतर संबंधित ठिकाणांची तातडीने स्वच्छता करून परिसर पूर्ववत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असेही बैठकीत सांगण्यात आले.

विसर्जनस्थळी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था प्रभावीपणे राबवावी. विसर्जनस्थळी जमा होणारे निर्माल्य नियमितपणे उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावावी. गणेशोत्सव काळात नागरिकांची गर्दी लक्षात घेऊन स्वच्छता कर्मचाऱ्यांची आवश्यक तैनाती करावी, असेही निर्देश देण्यात आले.

गणेशोत्सव काळात स्वच्छता व्यवस्था, निर्माल्य संकलन, कृत्रिम जलकुंडांची व्यवस्था आणि विसर्जनस्थळी आवश्यक सुविधा याबाबत सर्व संबंधितांनी समन्वयाने कार्यवाही करावी. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित गणेशोत्सवाचा अनुभव मिळण्यासाठी आवश्यक सर्व तयारी वेळेत पूर्ण करावी, असे डॉ. ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

### निर्माल्य कुंड, कृत्रिम जलकुंडांची व्यवस्था:

गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरातील सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मार्गांवरील स्वच्छता सुरळीत राहण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गणेशमूर्ती विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंड तसेच गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम जलकुंडांची पुरेशी व्यवस्था करण्याचे निर्देश डॉ. ठेंगल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# दहीहंडीचा लोखंडी सांगाडा ठरला जीवघेणा; जुन्या सांगवीत महिलेचा दुर्दैवी मृत्यू

» पिंपरी | प्रतिनिधी

**दहीहंडी उत्सवाचा जल्लोष संपल्यानंतर लोखंडी सांगाडा उतरविताना झालेल्या भीषण अपघातात ४५ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना जुन्या सांगवी परिसरात घडली. सलमा सलाउद्दीन पठाण असे मृत महिलेचे नाव आहे. उत्सवासाठी उभारण्यात आलेल्या लोखंडी संरचनेचा अवजड भाग अचानक निसटून त्यांच्या डोक्यावर कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पठाण कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, दहीहंडी उत्सवासाठी परिसरात मोठ्या स्वरूपात लोखंडी सांगाडा उभारण्यात आला होता. उत्सवाचा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर रात्री उशिरा हा सांगाडा उतरविण्याचे काम मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून सुरू होते. रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास लोखंडी संरचनेचा एक अवजड भाग काढला जात असताना अचानक निसटला. त्याचवेळी सलमा पठाण या घटनास्थळी उपस्थित होत्या. निसटलेला लोखंडी भाग थेट त्यांच्या डोक्यावर कोसळल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.

अवजड लोखंडी भागाचा जोरदार आघात झाल्याने सलमा पठाण यांचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिक आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. उत्सवाचा आनंद आणि जल्लोष संपल्यानंतर अवघ्या काही वेळातच घडलेल्या या दुर्घटनेने परिसरातील वातावरण शोकाकुल झाले.

या घटनेतील सर्वाधिक वेदनादायी बाब म्हणजे मृत सलमा पठाण यांचा मुलगा संबंधित दहीहंडी मंडळात सक्रिय कार्यकर्ता म्हणून कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे दहीहंडीच्या आयोजनाशी संबंधित कुटुंबातील व्यक्ती असतानाच त्यांच्या आईचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने पठाण कुटुंबीयांवर मोठे संकट ओढवले आहे. या घटनेची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली.

दरम्यान, सलमा पठाण यांच्या मुलाचा संबंधित दहीहंडी मंडळाशी असलेला संबंध लक्षात घेता कुटुंबीयांनी या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यास नकार दिल्याचे समजते. मात्र, सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी स्वतःहून घटनेची नोंद घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी कुटुंबीयांना सहकार्य करण्याची विनंती केली आहे. दुर्घटनेमागील नेमकी परिस्थिती, लोखंडी सांगाडा उतरविताना कोणत्या प्रकारची खबरदारी घेण्यात आली होती आणि संरचना सुरक्षितपणे हटविण्याची प्रक्रिया कशी राबविण्यात आली, याबाबतही तपास केला जात आहे.

या दुर्घटनेनंतर सार्वजनिक उत्सवांसाठी उभारण्यात येणाऱ्या लोखंडी संरचनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दहीहंडी, गणेशोत्सव तसेच अन्य सार्वजनिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात लोखंडी सांगाडे, स्टेज आणि इतर तात्पुरत्या संरचना उभारल्या जातात. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर या संरचना उतरवितानाही तितकीच खबरदारी घेणे आवश्यक असते. संरचना काढण्याच्या वेळी नागरिकांची व कार्यकर्त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, अवजड भाग सुरक्षितपणे खाली उतरविणे आणि घटनास्थळी अनावश्यक गर्दी होऊ न देणे महत्त्वाचे ठरते.

विशेषतः लोखंडी सांगाड्याचा अवजड भाग अचानक निसटल्याने थेट एका महिलेच्या जीवावर बेतलेली ही घटना सार्वजनिक उत्सवांच्या आयोजनातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे.

# मोशी–देहू–आळंदी मेट्रोसाठी साने आक्रमक; महामेट्रोला तातडीचे निर्देश!

## सुनेत्रा पवारांची दखल; ७ सप्टेंबरला लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ हर्डीकरांची भेट

**>> पिंपरी | प्रतिनिधी**

**मोशी–देहू–आळंदी थेट मेट्रो मार्गाचा आराखडा तयार करून या मार्गाच्या विकासाला गती देण्याची मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक मा. श्री. विकास नामदेव साने यांनी केली आहे. यासंदर्भात आज पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार साहेब यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.**



मोशी, देहू आणि आळंदी परिसरात गेल्या काही वर्षांत झपाट्याने नागरीकरण झाले असून, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे या भागातील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण झाला आहे. वाढणाऱ्या अपघात आणि त्यात मृत्युमुखी पडणाऱ्या निष्पाप नागरिकांची संख्या देखील अधिक आहे. त्याचबरोबर देहू आणि आळंदी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेशी आणि वारकरी संप्रदायाशी निगडित प्रमुख तीर्थक्षेत्रे असल्याने वर्षभर या परिसरात मोठ्या संख्येने भाविक व नागरिकांची ये-जा असते. पालखी सोहळे, यात्रा आणि धार्मिक कार्यक्रमांच्या काळात या मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

या पार्श्वभूमीवर मोशी–देहू आणि पुढे देहू–आळंदी असा थेट मेट्रो मार्ग विकसित झाल्यास नागरिक, भाविक आणि वारकऱ्यांना सुरक्षित, जलद व सुलभ सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होऊ शकते. तसेच भविष्यातील वाढत्या वाहतुकीचा विचार करता हा मार्ग पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे जिल्ह्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकतो, अशी भूमिका विकास नामदेव साने यांनी निवेदनाद्वारे मांडली.

या मागणीची उपमुख्यमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार साहेब यांनी सकारात्मक दखल घेतली. या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ पुणे महामेट्रोचे मा. श्री. श्रावण हर्डीकर साहेब यांना मोशी–देहू–आळंदी मेट्रो मार्गाच्या मागणीसंदर्भात आवश्यक तांत्रिक पाहणी, सर्वेक्षण व पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यामध्ये भविष्यातील प्रवासी संख्या, मार्गाची तांत्रिक व्यवहार्यता, संभाव्य स्थानके, विद्यमान व प्रस्तावित मेट्रो मार्गांशी जोडणी तसेच देहू–आळंदी या तीर्थक्षेत्रांच्या वाहतूक गरजा यांचा अभ्यास करून सविस्तर आराखडा तयार करण्याची मागणी विकास नामदेव साने यांनी केली आहे.

“मोशी–देहू–आळंदी हा केवळ वाहतुकीचा मार्ग नसून महाराष्ट्राच्या संतपरंपरेशी आणि वारकरी संस्कृतीशी जोडलेला महत्त्वपूर्ण परिसर आहे. नागरिक, भाविक आणि वारकऱ्यांच्या दृष्टीने या मार्गाला सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मिळणे अत्यंत आवश्यक आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार साहेब यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. श्रावण हर्डीकर साहेब यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.

याच अनुषंगाने येत्या सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी देहू-आळंदी सह , डुडुळगाव, मोशी, जाधववाडी, चिखली व तळवडे परिसरातील लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचे शिष्टमंडळ माझ्यासोबत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. श्रावण हर्डीकर साहेब यांची भेट घेणार आहे. या भेटीत मोशी–देहू–आळंदी मेट्रो मार्गासाठी तांत्रिक पाहणी, सर्वेक्षण, व्यवहार्यता तपासणी तसेच सविस्तर आराखडा तयार करण्याबाबत पुढील कार्यवाहीची मागणी करण्यात येणार आहे.

नागरिकांच्या या महत्त्वपूर्ण मागणीला शासनस्तरावर मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आणि आता महामेट्रोसोबत होणारी प्रत्यक्ष चर्चा यामुळे मोशी–देहू–आळंदी मेट्रो मार्गाच्या मागणीला निश्चितच गती मिळेल, असा मला विश्वास आहे.” अशी भावना नगरसेवक विकास नामदेव साने यांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या प्रश्नांसोबतच भविष्यातील शहर विकासाचा विचार करून पायाभूत सुविधांसाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी विकास नामदेव साने यांनी व्यक्त केला.

# अ‍ॅपेक्स स्कूलमध्ये कृष्णरंग; ‘गोविंदा आला रे!’च्या गजरात दहीहंडीचा थरार!

**>> पिंपरी | प्रतिनिधी**

**चऱ्होली येथील अ‍ॅपेक्स स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाल्याचा सण अत्यंत भारावलेल्या, चैतन्यमय व भक्तिमय वातावरणात दिमाखात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीची पाळेमुळे रुजावीत, तसेच त्यांना भगवान श्रीकृष्णाच्या जीवनमूल्यांची आणि भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाची ओळख व्हावी, या उदात्त हेतूने या वैशिष्ट्यपूर्ण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा प्रारंभ शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. मानसी गिल पंडित, उपमुख्याध्यापिका लीना तुगडे, विभागप्रमुख नीलम टोणगे आणि बालवाटिका विभागप्रमुख कोमल कदम यांच्या शुभहस्ते बाळकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन व भावपूर्ण आरतीने झाला.**









याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जन्माष्टमीचे आध्यात्मिक व सामाजिक महत्त्व विशद करून प्रेरित केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मंचावर सादर केलेल्या वैविध्यपूर्ण कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. भगवद्गीतेतील पंधराव्या अध्यायाचे सुश्राव्य पठण, श्लोकांचे अर्थासहित विवेचन आणि श्रीकृष्णाच्या चरित्रातील प्रेरक प्रसंगांवर आधारित प्रभावी कथाकथनातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील ज्ञान व संस्कारांचे उत्तम दर्शन घडविले.

राधा-कृष्णाच्या नयनरम्य व मनमोहक वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी सादर केलेली पाळणा गीते, पारंपरिक नृत्ये, सुमधुर गवळणी आणि जिवंत अभिनयाने शाळेच्या प्रांगणात जणू साक्षात गोकुळाचीच अनुभूती निर्माण केली. बालगोपाळांच्या या लोभस लीलांनी संपूर्ण वातावरण कृष्णरंगात न्हाऊन निघाले होते.

या संपूर्ण सोहळ्याचा कळसाध्याय ठरला तो म्हणजे ‘गोविंदा आला रे आला!’च्या गगनभेदी जयघोषात रंगलेला दहीहंडीचा थरार. पारंपरिक वाद्यांचा ताल, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहकाऱ्यांच्या भक्कम साथीने मानवी मनोरे रचून फोडण्यात आलेल्या मानाच्या दहीहंडीने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी शिस्त, परस्पर सहकार्य, आनंद आणि संघभावनेचा एक आदर्श संदेश दिला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध रीतीने पार पडलेला हा अनुपम सोहळा संस्कार, कला आणि एकोप्याचा सुंदर मिलाफ ठरत सर्वांच्या कायमस्वरूपी स्मरणात कोरला गेला.

# पुण्याची कोंडी फुटणार; 3-4 वर्षांत वेगवान वाहतुकीचे शहर!

## रिंग रोड, भुयारी मार्ग, मेट्रोला वेग; पीएमपीएमएल सक्षम करण्याचा निर्धार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील वाढता ताण आणि प्रवासासाठी लागणारा वेळ यामुळे त्रस्त झालेल्या पुणेकरांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याची ओळख देशातील सर्वाधिक वेगवान वाहतूक असलेले शहर अशी निर्माण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. पुण्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यात येत असून, रिंग रोड, अंतर्गत वर्तुळाकार मार्ग, भुयारी मार्ग, उच्च क्षमता द्रुतगती मार्ग तसेच मेट्रोच्या विस्तारित जाळ्यावर भर दिला जात आहे.**



‘बजाज फिनसर्व्ह’च्या मुख्यालयाच्या भूमिपूजन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महापौर मंजूषा नागपुरे, बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, बजाज फिनसर्व्ह सीएसआरच्या अध्यक्ष शेफाली बजाज, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज समूहातील पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुण्यातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अनेक मोठे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. बाह्य वर्तुळाकार मार्ग आणि अंतर्गत वर्तुळाकार मार्गामुळे शहरातील वाहतूक थेट शहराच्या मध्यवर्ती भागात येण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर भुयारी मार्ग आणि उच्च क्षमता द्रुतगती मार्गाच्या माध्यमातून महत्त्वाच्या मार्गांवरील वाहतूक अधिक वेगवान करण्याचे नियोजन आहे. सुरू असलेल्या कामांना गती देण्याबरोबरच प्रस्तावित प्रकल्प मार्गी लावण्यावरही सरकारचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच पुणे शहर आणि परिसरातील मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी पीएमपीएमएलमध्येही सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. खासगी वाहनांवरील वाढते अवलंबित्व कमी करून नागरिकांना जलद आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हा वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा भाग ठरणार आहे. या सर्व प्रकल्पांचा एकत्रित परिणाम पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पुण्यात उभारण्यात येणारे बजाज फिनसर्व्हचे नवीन मुख्यालय आणि त्यातील सुविधा देशातील महत्त्वाची व शाश्वत व्यवस्था ठरणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या प्रकल्पामध्ये सुमारे ४० हजार कर्मचारी सहभागी होणार आहेत. त्यामुळे या भागातील वाहतूक व्यवस्थेवर भविष्यात वाढणारा ताण लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा आधीच उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यालयाचे काम पूर्ण होण्यापूर्वी मुंढवा परिसराला जोडणारा रस्ता आणि अतिरिक्त पूल उभारण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

बजाज समूहाने पुण्यात कला आणि सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा मनोदय व्यक्त केला असून, महानगरपालिकेसह सर्वांच्या सहकार्याने हे केंद्र उभारण्यात येईल, असेही फडणवीस यांनी सांगितले. पुण्याच्या विकासामध्ये पायाभूत सुविधांसोबतच कला, संस्कृती आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्यावरही सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### मुंबई-पुणे वित्त तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर!

मुंबई आणि पुणे ही शहरे देशातील वित्त तंत्रज्ञान परिसंस्थेत आघाडीवर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. यंदाच्या पहिल्या तिमाहीत मुंबईने बंगळुरूला मागे टाकले असून, देशातील एकूण वित्त तंत्रज्ञान गुंतवणुकीपैकी ६१ टक्के गुंतवणूक मुंबईत झाली आहे. वित्त तंत्रज्ञान क्षेत्रातील नवउद्यमींमध्येही ५९ टक्के वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात या क्षेत्रात सुमारे ९० कोटी डॉलरची गुंतवणूक झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

# ‘बाळकडू’ नव्हे, वाचनाची ताकद! विद्यानंद बापटांच्या मराठीचं गुपित उलगडलं

» पिंपरी | प्रतिनिधी

**डीजे आणि अनधिकृत ध्वनिक्षेपकांविरोधात ठाम भूमिका घेत चर्चेत आलेले विद्यानंद बापट सध्या त्यांच्या अस्खलित, शुद्ध आणि अभ्यासपूर्ण मराठी भाषेमुळेही चर्चेचा विषय ठरले आहेत. विविध विषयांवर रोखठोक भूमिका मांडताना त्यांच्या भाषेत दिसणारे नेमकेपण, संस्कृतप्रचुर शब्दांचा प्रभावी वापर आणि ऐतिहासिक-सामाजिक दाखल्यांची अचूक मांडणी याचे कौतुक थेट मुख्यमंत्र्यांनीही केले आहे. मात्र, बापट यांच्या या भाषिक आणि वैचारिक जडणघडणीमागे नेमके काय आहे, याचा उलगडा त्यांचे वडील सुहास बापट यांनी केला आहे.**



विद्यानंद बापट यांचे कुटुंब मूळचे पुणेकर असून त्यांचे बालपण आणि शालेय शिक्षण पुण्यातच झाले. पहिली ते चौथीपर्यंत त्यांनी नवीन मराठी शाळेत शिक्षण घेतले, तर नववीपर्यंतचे शिक्षण रमणबाग प्रशालेत झाले. त्यानंतर कौटुंबिक कारणामुळे बापट कुटुंबीय रत्नागिरीतील मूळ गावी स्थायिक झाले. तेथे फाटक हायस्कूलमधून नववी-दहावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यानंद यांनी रत्नागिरीतील प्रसिद्ध गोगटे महाविद्यालयातून वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतले.

मात्र, त्यांच्या भाषेवर प्रभुत्व निर्माण होण्यामागे केवळ शालेय शिक्षण कारणीभूत नसून लहानपणापासूनच लागलेले वाचनाचे वेड ही त्यांची खरी ताकद असल्याचे सुहास बापट सांगतात. इयत्ता दुसरीपासूनच विद्यानंद यांना वाचनाची आवड निर्माण झाली. पुण्यात असताना ते मराठी ग्रंथालयात तासन् तास बसून विविध पुस्तके वाचत आणि त्यावर मनन करत असत. केवळ एका विचारसरणीपुरते मर्यादित न राहता वेगवेगळ्या विचारप्रवाहांतील साहित्याचा त्यांनी अभ्यास केला.

एस. एम. जोशी यांचे साहित्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना आणि सामाजिक विषयांवरील लेखन तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. या विविधांगी वाचनामुळे त्यांच्या भाषेला केवळ शब्दांची समृद्धी मिळाली नाही, तर कोणत्याही विषयाकडे चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहण्याची सवयही लागली. त्यामुळेच एखाद्या विषयावर बोलताना संदर्भ, दाखले आणि मुद्देसूद मांडणी त्यांच्या भाषणात सहजपणे दिसून येते.

विद्यानंद यांच्या भाषा कौशल्याबद्दल बोलताना सुहास बापट यांनी मुलाच्या जडणघडणीचा अभिमानाने उल्लेख केला. “आम्ही काही वेगळे बाळकडू दिले नाही. तो लहानपणापासूनच स्वतः मन लावून वाचायचा आणि विचार करायचा. खरे सांगायचे तर ही त्याच्यातील एक दैवी शक्तीच आहे. त्याची जिद्द, चिकाटी आणि धाडस यामुळेच तो आज कोणत्याही विषयावर अत्यंत अभ्यासू आणि रोखठोक भूमिका मांडू शकतो,” असे त्यांनी सांगितले.

आज विद्यानंद बापट यांच्या मराठी भाषेची आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीची चर्चा महाराष्ट्रभर होत असली, तरी या भाषिक सामर्थ्याचा पाया त्यांच्या बालपणीच्या वाचनसंस्कृतीतच घातला गेला आहे.

### दुसरीपासूनच लागलं वाचनाचं वेड!

इयत्ता दुसरीपासूनच विद्यानंद बापट यांना वाचनाची आवड लागली. पुण्यात असताना मराठी ग्रंथालयात तासन्तास वाचन आणि मनन करत त्यांनी विविध विचारवंतांचे साहित्य अभ्यासले. एस. एम. जोशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या लेखनातून त्यांची वैचारिक बैठक घडली. याच व्यापक वाचनामुळे त्यांच्या भाषेला समृद्धी आणि विचारांना धार मिळाल्याचे वडील सुहास बापट यांनी सांगितले.

पुस्तकांमधून मिळालेले ज्ञान, त्यावर केलेले मनन आणि कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करण्याची वृत्ती यामुळे त्यांची भाषा अधिक प्रभावी आणि धारदार बनली.